# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 12/01/2022 (बुधवार)

(सकाळ)

---

### जबरी चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत तहसिल कार्यालयाकडे जाणा–या रोडवर सावनेर येथे दिनांक 11/01/2022 चे 12.30 वा. दरम्यान अज्ञात आरोपी याने सायकलवर फिर्यादी नामे– श्री आनंदराव महादेव येलेकर वय 65 वर्ष रा. तेलणखेडी ता.सावनेर यांचेजवळ जावुन त्यांच्या हातातील बाजाराची थैली सायकलवर ठेवुन रोडवर असलेले निंबाचा झाडाजवळ थांबवुन तंबाखु मागुन घेवुन त्यासाठी लागणारा चुना मागितला असता तो फिर्यादी यांचाकडे नसल्याने त्यांनी दिला नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादीचा अंगावरिल बनियान असलेल्या खिशात बळजबरीने हात घालुन खिशातील रोख रक्कम 10,000/–रू. हिसकावुन काढुन घेवुन पडुन गेला.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 392 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि सागर कांरडे मो.नं. 7722011228 हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत 02 कि. मी. अंतरावरील बजाज स्टील कंपनी एमआयडीसी बोरी येथे दिनांक 11/01/2022 चे 04.00 वा. दरम्यान आरोपी क्र. 1) संदीप नारायण चव्हान वय 36 वर्ष रा. बुटीबोरी व 2) शुभम ज्ञानेश्वर तांदूळकर वय 24 वर्ष रा. पळसगाव जि. वर्धा हे बजाज स्टील प्रा. लि. कंपनीमध्ये सिक्यूरिटी गार्डची डयूटी करीत असून त्यांनी संगनमत करून बजाज स्टील कंपनी येथून पांढ–या बोरीमध्ये लोखंडी सळाखी वजन अंदाजे 40 किलो किंमती 1,200/–रू., होन्डा 1 स्मार्ट मोटरसायकल एमएच.– 40/ई – 2063 किंमती अंदाजे 15,000/– रू. असा एकुण 16,200/–रू. चा मुद्देमाल मोटारसायकलवर घेवून जातांना मिळून आले. फिर्यादीने पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे सदर आरोपीतांना आणून पेश केल्याने व रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अनिस अहमद शेख उर्फ रहीम यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 381, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार दयाराम करपाते मो.क्र. 9960682478 हे करीत आहे.

2) पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 6 कि. मी. अंतरावरील नयाकुंड शिवार येथे दिनांक 10/01/2022 ते 11/01/2022 चे 12.00 वा. ते 06.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ऋषिकश संतोश नेवारे, वय 19 वर्ष, रा. नयाकुंड शिवार हा ग्राम पंचायत नयाकुंड येथे पाणी पुरवठा कर्मचारी म्हणुन काम करतो. फिर्यादी हा मोटार सुरू करण्यास गेला असता पाणी पुरवठयाचे विहिरीवर पाण्याचे मोटार पंपला लागलेली 50 फुट लांबीचा काळया रंगाचा ईलेक्ट्रीक कॉपर केबल किंमती 3,000/–रूपये तसेच त्याचा बाजुला हेमराज निभाने यांचे शेत मध्ये लावलेल्या मोटारीवा काळया रंगाचा इलेक्ट्रीक कॉपर केबल 70 फुट किंमती 3,500/–रू. एकुण केबल 120 फुट किंमती 6,500/–रू. चा केबल अज्ञात आरोपीने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार चौधरी मो.क्र. 8830509441 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर